*Appendix I (vi)*, **(Vide Article - 1.05)**

## प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

**स्थाई आदेश क्रमांक :- १९**

**विषय :- राज्यात अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची किंमत तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत ठरविणे बाबत.**

क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.१०२(०७-०८)/ /२००९-१०
नागपूर ४४० ००१, दिनांक 24-04-2009

राज्यात अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची किंमत ठरवितांना तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत ठरवितांना सर्वच ठिकाणी एकसारखी पध्दत अस्तित्वात नाही. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी पध्दत अवलंबविण्यात येत आहे. त्यामुळे कांही ठिकाणी थुटांची किंमत ही वस्तुस्थितीपेक्षा कमी किंवा जास्त असते. जीवनशास्त्र विषयक पदार्थामध्ये होणा-या विस्तृत प्रमाणातील बदल हे जरी कमी जास्त होत असले तरी अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांची किंमत ही थुटावरुन ठरवितांना तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत ठरवितांना त्यामध्ये जास्त फरक राहु नये ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. यामध्ये मुख्यत: अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची गोलाई ही किती उंचीवर घेण्यात यावी, तोडलेल्या थुटांच्या वृक्षाचे घनफळ किती असावे व ते कसे काढण्यात यावे, अवैधतोड झालेल्या वृक्षांची किंमत काढतांना कुठला दर लक्षात घेण्यात यावा तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाच्या किंमतीची गणना करण्यासाठी कुठला दर लक्षात घेण्यात यावा या बाबत सर्व वनवृत्तस्तरावर एकरुपता राहणे आवश्यक आहे. याबाबत महालेखापाल यांचे दिनांक ८ सप्टेंबर २००७ चे बैठकीत महालेखाकार ऑडीट-II, नागपूर व अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सुध्दा पुनर्विलोकन करण्यांचे निर्देश दिलेले होते. त्यानुसार खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

(i) थुटाची गोलाई ही जमिनीपासुन १५ से.मी. उंचीवर घेण्यात यावी.

(ii) जमिनीपासुन १५ से.मि. वर घेतलेल्या थुटाच्या सालीसहीत गोलाईनुरुप Corresponding छातीगोलाई किती घ्यावी, याबाबतचे परस्परसंबंध (correlation) तसेच थुटाच्या उंचीवर सालीसहीत गोलाई लक्षात घेता संबंधीत गोलाईचे वृक्षापासुन किती घनमिटर माल निघु शकेल याचा तक्ता

खालील प्रमाणे दिला आहे. (सदर घननिटर काढतांना भारतीय वनसंशोधन संस्था, डेहराडून यांनी प्रकाशित केलेल्या आकडेवारीचा आधार घेऊन व त्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार योग्य दुरुस्ती करण्यात आलेली आहे)

| अ.क्र. | थुटाच्या उंचीवर गोलाई वर्ग (साली सहीत) | त्या संबंधात छाती उंचीवरील गोलाई वर्ग (साली सहीत) | संबंधीत वनोपजाचे घनफळ प्रती झाड (घनमीटर मध्ये) | |
|---|---|---|---|---|
| | | | अमरावती/नागपूर/नाशिक/ उत्तर चंद्रपूर/दक्षिण चंद्रपूर व ठाणे वनवृत्तासाठी | औरंगाबाद/धुळे/ कोल्हापूर/ पुणे व यवतमाळ वनवृत्ताकरिता |
| १. | १५ - ३० | १५-३० | ०.००७ | ०.००७ |
| २. | ३० - ४५ | १५-३० | ०.०१६ | ०.०१६ |
| ३. | ४५-६० | ३०-४५ | ०.०३७ | ०.०३७ |
| ४. | ६०-७५ | ४५-६० | ०.०६१ | ०.०५९ |
| ५. | ७५-९० | ६०-७५ | ०.०९४ | ०.०८१ |
| ६. | ९०-१०५ | ७५-९० | ०.१४५ | ०.११० |
| ७. | १०५-१२० | ७५-९० | ०.२११ | ०.१४५ |
| ८. | १२०-१३५ | ९०-१०५ | ०.२९४ | ०.१९२ |
| ९. | १३५-१५० | १०५-१२० | ०.३८५ | ०.२४५ |
| १०. | १५०-१८० | १२०-१३५ | ०.५४२ | ०.३४२ |
| ११. | १८०-२१० | १३५-१५० | ०.७६३ | ०.४९३ |
| १२. | २१० च्यावर | १५०-१८० | १.०११ | ०.६७४ |

(iii) अवैधरित्या तोड झालेल्या वृक्षांचे वर्गीकरण खालील प्रमाणे ३ संवर्गामध्ये करण्यात यावे.

(अ) सागवान
(ब) उच्चप्रतीचे आडजात (Superior Injaili) (ऐन, बिजा, शिसन, शिवण, हल्दू, कलम इत्यादी)
(क) निम्नप्रतीचे आडजात (Inferior Injaili) (तेंदू, मोहा, बेहडा, सालई, सेमल इत्यादी)

(iv) उपरोक्त (iii) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक संवर्गातील किती माल वनवृत्तातील र्स्व आगारात दिनांक १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत विकल्या गेला आहे व त्यास किती किंमत प्राप्त झालेली आहे ही काढण्यात यावी. नंतर संवर्गातील एकुण प्राप्त किंमतीस त्या संवर्गातील एकूण विक्री झालेल्या

मालाने भागावे व जो सरासरी प्रति घनमिटर दर येईल तो प्रतिघनमिटर स्थुल दर (Gross) म्हणुन लक्षात घेण्यात यावा.

(v) दिनांक १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या एकवर्षाच्या कालावधीच्या दरम्यान किती मालाचे निष्कासन केले व त्याला किती निष्कासनाचा व वाहतूकीचा खर्च आला हे काढण्यात यावे. तदनंतर या खर्चास निष्कासीत झालेल्या मालाने भागुन प्रति घनमिटर सरासरी निष्कासनाचा व वाहतूकीचा दर म्हणुन लक्षात घेण्यात यावा.

(vi) उपरोक्त (iv) मधील प्रतिघनमिटर सरासरी दरातून उपरोक्त (v) मधील प्रतिघनमिटर सरासरी निष्कासनाचा व वाहतूकीचा दर वजा करुन निव्वळ प्रति घनमिटर सरासरी अनुसूचीत दर काढण्यात यावा.

(vii) सदर निव्वळ अनुसूचित दराने ज्या गोलाई वर्गातील वृक्षाची अवैध कटाई झाली त्यातील उपरोक्त (ii) मध्ये नमूद केलेल्या घनमिटरला गुणून वृक्षाची किंमत काढण्यात यावी.

(viii) जप्त केलेल्या मालासाठी सुध्दा उपरोक्त (vi) मध्ये नमूद केलेला अनुसूचित दर लावण्यात यावा. यासाठी जप्त केलेल्या मालाचे प्रत्यक्षात घनमिटर किती आहे हे काढुन व उपरोक्त (vi) मध्ये नमूद केलेल्या दराने गुणून जप्त मालाची किंमत काढण्यात यावी.

(ix) उपरोक्त (vi) मध्ये नमूद दर हा अवैध वृक्षतोडीच्या मौक्यावर जप्त माल तसेच इतर ठिकाणी जप्त माल या दोन्हीसाठी लागु करावा.

(x) उपरोक्त (vii) नुसार येणा-या किंमतीतून (अवैधरित्या तोड केलेल्या वृक्षांच्या किंमतीमधुन) उपरोक्त (viii) नुसार येणारी किंमत (जप्त केलेल्या मालाची किंमत) वजा करुन उर्वरित जी रक्कम येईल ती रक्कम नुकसान म्हणुन समजण्यात यावी.

या पध्दतीनुसार जर मागील वर्षापेक्षा पुढील/चालु वर्षाचे अनुसुचित दर कमी असतील तर पुढील/चालु वर्षाकरिता अनुसुचित दर कमी करण्यात येवू नये व अशा परिस्थितीत मागील वर्षाचे अनुसुचित दर त्या पुढील/चालु वर्षाकरिता कायम ठेवण्यात

यावेत. मात्र पुढील/चालु वर्षाचे अनुसुचित दर मागील वर्षापेक्षा जास्त असतील तर अशा परिस्थीतीत पुढील/चालु वर्षाचे अनुसुचित दर लागु करण्यात यावे.

उपरोक्त निर्देशाचे पालन तंतोतंत करण्यात यावे. यामध्ये कुठलीही हयगय होणार नाही, याची वैयक्तिक दक्षता मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)/वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी ही दिनांक १ ऑक्टोबर २००९ पासुन करण्यात यावी.

स्वा/-
प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक वनविकास महामंडळ, म.रा. नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक (सर्व)
वनसंरक्षक, (सर्व)
उपवनसंरक्षक, प्रादेशिक (सर्व)
उप विभागीय वन अधिकारी प्रादेशिक (सर्व)

प्रतिलिपी :- अपर मुख्य सचिव (वने) महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडे माहितीकरीता सादर.

प्रतिलिपी :- महालेखाकार (ऑडिट-II) म.रा. नागपूर यांना दि.८ सप्टेंबर, २००७ ला घेतलेल्या बैठकीचे अनुरोधाने माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- कक्ष अधिकारी -१० प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्यालय, म.रा. नागपूर यांना ३ प्रतिसह माहितीकरीता रवाना.